# VIVEK TUTORIALS

IX (English)

(Special Test)

Marathi-(9 10)

DATE: 10-02-19

TIME: 1 hour

MARKS: 25

SEAT NO:

विभाग १ - गदय

प्र. १ खालील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

1) सूचनेप्रमाणे कृती करा. 2

1.




2. साध्या बाजारी कुलुपांच्या बाबत लेखकाने वर्णन केलेली वृत्ती -

आपल्या उपयोगतील सर्व किल्ल्या बंडूनाना आपल्या जानव्यात अडकवून ठेवत असल्यामुळे त्या कधी हरवत नाहीत. हरवतात त्या बहुतकरून त्यांच्या कुटुंबाच्या ताब्यातल्या किल्ल्या. वरील अनर्थ गुदरल्यापासून साधी बाजारी कुलपेच ते कुटुंबाच्या स्वाधीन करू लागले. ही कुलपे किल्ल्यांच्या बाबतीत काहीच विधिंनिषेध बाळगत नसत. त्यांना कोणतीही किल्ली, खिळा किंवा काडी चालत असे. कधी कधी तर नुसत्या हिसक्यानेच ती उघडत असत. त्यांची अशी 'वसुधैव कुटुंबकम्' वृत्ती पाहून शेवटी नानांच्या पदरच्या एका विश्वासू नोकरलाही चोरी करण्याची इच्छा जाहली व तो हजारपाचशे डबोले घेऊन पळून गेला. तिजोरीला कोणते कुलूप लावायचे याचा बंडूनानांना फार दिवस प्रश्न पडला होता. प्रथम त्यांनी अक्षरी कुलूप लावले; पण तिजोरी अंधारात असल्यामुळे कुलपाची अक्षरे जमवताना ती नीट दिसेनातच, म्हणून त्यांनी तिजोरी महत्प्रयासाने उजेडात आणून ठेवली. पण तेव्हापासून अक्षरे जुळवताना ती जवळ उभे राहणारसही दिसू लागली. तेव्हा ती कुलपेही कुचकामीच ठरली. यापेक्षा अशरशत्रू कुलपे पुष्कळ बरी, असा टोला देत देत त्यांनी त्या कुलपाच्याऐवजी दुस-या कुलुपाची योजना केली.हे कुलूप नुसते दाबले की लागत असे. उघडताना मात्र त्याला किल्लीची जरूर लागे. एके दिवशी बंडूनाना आम्हांकडे हर्षित मुद्रेने येऊन म्हणे लागले, " आमच्या आर्यभूमीच्या पुत्रांना कल्पकता नाही म्हणून चोहोकडे ओरड चालू आहे. पण हा आरोप निव्वळ खोटा आहे. अहो, आम्हांला संधी मिळत नाही साधी! ती मिळाली तर आम्हांकडे शेकडो एडिसन जाहले असते." देशाभिमानाच्या या उकळीचा अर्थ विचारता बंडूनानांना प्रथम आपली कोणत्याही प्रकारे स्तुती करणार नाही. असे आम्हापासून वचन घेतले. नंतर लोहारच्या मदतीने त्यांनी स्वत: तयार केलेले एक कुलूप दाखवले. ते म्हणाले, " या कुलूपाची कल्पना मला आमच्या तिजोरीच्या कुलपावरून सुचली. या कुलपाचे गुणधर्म त्या कुलपाच्या अगदी विरुद्ध आहेत. त्या कुलपास उघडण्याला किल्ली पाहिजे. याला लावताना मात्र पाहिजे ते कुलूप नुसते दाबून लावता येते. माझे हिसड्यासारखे उघडते. हे कुलूप मी-आता तिजोरीला लावून पूर्वीचे काढून टाकणार."

2) खालील विधानांची कारणे लिहा. 2

1. बंडूनानांच्या किल्ल्या कधीच हरवत नसत कारण -

2. बंडूनाना साधी बाजारी कुलपेच कुटुंबाच्या स्वाधीन करत कारण-

3) 1. खालील शब्दांचे समानार्थी शब्द उताऱ्यातून शोधा. 1

i. सुपूर्द - ☐

ii. इटका - ☐

2. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द उताऱ्यातून शोधा.
i. प्रकाश × .............. 1
ii. कुलूप × ..............

4) स्वमत :- 2
घराच्या सुरक्षेसाठी तुम्ही कोणकोणत्या उपाय योजना कराल.

विभाग २ - पदय

प्र. २ खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

1) अ) कृती करा. 1
कवितेत आलेले -




ब) एका वाक्यात उत्तरे लिहा. 1
1) कोकिळेची सुरेल तान कोठून आली ?

सळसळ झळझळ पिंपळ पाने
मऊ मुलायम मोरपिसापरी,
सांबर लाल कळ्यांनी लखडून
उभे स्वागता पाणंदीवरी ||4||

पळसफुले ही बहरून आली
या मातीच्या अंकावरती,
कुसुमे सारी या जगातली
पाहून त्यांना मनात झुरती||5||

आंब्याच्या मोहरातून आली
कोकिळेची सुरेल तान,
उजाड उघडे माळरानही
गाऊ लागले वसंतगान ||6||

2) जोड्या लावा. 2

| अ - गट | ब - गट |
|---|---|
| 1) माळरान | अ) अंकावर |
| 2) पळसफुले | ब) मोरपिसापरी |
| 3) पिंपळ पाने | क) उजाड उघडे |
| 4) सांबर | ड) लाल कळ्या |

3) आशय स्पष्ट करा. 2

पळसफुले ही बहरून आली
या मातीच्या अंकावरती,
कुसुमे सारी या जगातली
पाहून त्यांना मनात झुरती||5||

4) स्वमत :- 2
सृष्टीचे सौदर्य कायम राहण्यासाठी तुम्हांला सुचतील असे उपाय लिहा.

विभाग ३ - भाषा अध्यन (व्याकरण)

प्र. ३ (१) समास - (2)

खालील तक्ता पूर्ण करा.

| | | | |
|---|---|---|---|

| अ. क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| 1. | मीठ भाकरी | ............. | ............. |
| 2. | बरेवाईट | ............. | ............. |

2) अलंकार - (1)

खालील उदाहरण वाचून कृती करा.

हा आंबा जणू काय साखर वाटेल तुम्हांला.
उपमेय, उपमान, समान धर्म, साधर्म्यवाचक शब्द ओळखा.

| | |
|---|---|
| उपमेय - .............. | उपमान - .............. |
| समानधर्म - .............. | साधर्म्यवाचक शब्द - .............. |

3) विरामचिन्हे (1)

खालील वाक्यात विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहाः-

आजी म्हणाली शेतात एक साप होता.

विभाग ४ - उपयोजित लेखन

प्र. ४ खालील विषयावर पत्र लिहा. (5)

